साप्ताहिक
# पुणेरी चळवळ
संपादक : सुनिल बालकिसन गोयल
मो. ९८६३६५४६५४
RNI No: MAHMAR/2020/87539
www.punerichalval.co.in
वर्ष ५ | अंक ५१ | पुणे, गुरुवार १८ डिसेंबर २०२५ ते २४ डिसेंबर २०२५ | मुल्य : २ रु | पान ४
Volum 5 | Issue : 51 | Pune, Thursday, 18 December 2025 2025 to 24 December 2025 | Price : 2 Rs/- | Pages : 4

## कोकाटेंची अटक अटळ!

- **अटक वॉरंट जारी, खाते काढून घेतले, मंत्रिपद कायम**

**मुंबई :** नाशिक सत्र न्यायालयाने अटकेचे फर्मान काढल्यानंतर मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतलेल्या मंत्री माणिकराव कोकाटेंच्या पदरी निराशा पडली. अटकेला स्थगिती मिळावी, यासाठी कोकाटे यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली. पण उच्च न्यायालयाने तातडीने सुनावणी घेण्यास नकार दिला. या प्रकरणी शुक्रवारी सुनावणी होणार आहे. त्यामुळे कोकाटेंच्या अटकेची शक्यता वाढली आहे. त्यातच रात्री उशिरा कोकाटे यांच्याकडील मंत्रिपदाचे खाते काढून घेण्यात आले. मुख्यमंत्र्यांनी तशी शिफारस केल्याने आता खाते अजित पवार यांच्याकडे सोपविले आहे. त्यामुळे कोकाटे आता बिनखात्याचे मंत्री राहिले आहेत. मुंबई उच्च न्यायालयाने निर्णय कायम ठेवल्यास मंत्रिपदाचा राजीनामाही घेतला जाऊ शकतो. दरम्यान, कोकाटे यांनी पक्षाचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे राजीनामा देऊन ठेवला असल्याचे समजते.

शासकीय कोट्यात येणा-या सदनिका गैरव्यवहार प्रकरणात मंत्री माणिकराव कोकाटे यांना २ वर्षांचा तुरुंगवास आणि १० हजार दंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. प्रथम वर्ग न्यायालयाने कोकाटे यांना ठोठावलेली शिक्षा जिल्हा सत्र न्यायालयाने कायम ठेवली. न्यायालयाने कोकाटे यांच्या अटकेचे आदेश काढले आहेत. दुसरीकडे कोकाटे यांची आमदारकी रद्द होण्याच्या दृष्टीने हालचाली सुरु झाल्या आहेत. कोकाटे यांना कोणत्याही क्षणी अटक होऊ शकते. कोकाटे सध्या मुंबईतील लिलावती रुग्णालयात उपचार घेत आहेत. अटक वॉरंट जारी करताच कोकाटे तात्काळ लिलावती रुग्णालयात दाखल झाले.



कोकाटे आजारी असून, त्यांच्यावर उपचार सुरु असल्याने या प्रकरणी सहानुभूतीपूर्वक विचार करावा, अशी विनंती कोकाटे यांच्या वकिलांकडून न्यायालयाला करण्यात आली. पण कायद्यापुढे सगळे समान आहेत, असे न्यायालयाने कोकाटे यांच्या वकिलांना सुनावले. त्यामुळे कोकाटे यांना दिलासा मिळाला नाही. अटक टाळण्यासाठी कोकाटे यांच्या वकिलांनी उच्च न्यायालयात धाव घेतली. पण उच्च न्यायालयाने तातडीची सुनावणी घेण्यास नकार दिला. त्यामुळे कोकाटे यांच्या अडचणी वाढल्या आहेत.

लोकप्रतिनिधी कायद्यानुसार एखाद्याला २ किंवा त्याहून अधिक वर्षांची शिक्षा झाल्यास त्याचे पद रद्द होते. त्यामुळे कोकाटे यांची आमदारकी रद्द होणे निश्चित मानले जात आहे. न्यायालयाच्या निकालाचे पत्र प्राप्त झाल्यावर विधिमंडळ यासंदर्भात निर्णय घेईल. अद्याप तरी विधिमंडळाला न्यायालयाच्या निकालाची पत्र मिळालेली नाही. माणिकराव कोकाटे त्यांच्या विधानांमुळे सातत्याने वादात राहिले आहेत. सुरुवातीला त्यांच्याकडे कृषिमंत्रिपद देण्यात आले होते. पण त्यांच्या वादग्रस्त विधानांमुळे सरकारवर अनेकदा नामुष्की ओढवली. अखेर त्यांच्याकडून कृषी मंत्रिपद काढून घेण्यात आले. त्याऐवजी क्रीडा आणि युवक कल्याण मंत्रालयाची जबाबदारी देण्यात आली.

२ वर्षांची शिक्षा झाल्याने क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागणार, अशी चिन्हे होती. परंतु उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुन्हा त्यांना अभय देत मंत्रिपद कायम ठेवले. मात्र त्यांच्याकडील सर्व खाती काढून घेऊन त्यांना बिनखात्याचे मंत्री करण्यात आले. कोर्टाच्या निर्णयाने मंत्रिपदावर बेतले होते. परंतु ऐनवेळी आता खात्यावर निभावले. परंतु हे सर्व हायकोर्टाच्या निर्णयावर अवलंबून आहे.

मंत्री माणिकराव कोकाटे यांना तात्काळ रिलीफ देण्यात हायकोर्टाने नकार दिला. त्यामुळे माणिकराव कोकाटे आता ६ वर्षे निवडणूक लढू शकत नाहीत, अशी माहिती विधिमंडळाचे माजी प्रिन्सिपल सेक्रेटरी डॉक्टर अनंत कळसे यांनी दिली. त्यांना कोर्टाने शिक्षा सुनावल्याने ते तात्काळ डिस्क्वालिफाय झाले आहेत, असे कळसे म्हणाले.

बनावट कागदपत्रांच्या आधारे मुख्यमंत्री कोट्यातील सदनिका लाटल्याच्या प्रकरणात कनिष्ठ न्यायालयाने सुनावलेली २ वर्ष तुरूंगवासाची शिक्षा सत्र न्यायालयाने कायम ठेवल्याने क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांचे मंत्रिपद व आमदारकी पुन्हा धोक्यात आली आहे. आता उच्च न्यायालयाने शिक्षेला स्थगिती दिली तरच कोकाटेंवरील गंडांतर टळू शकणार आहे. दरम्यान, कोकाटे यांची जागा रिकामी झाल्यास आपले पुनर्वसन व्हावे, यासाठी धनंजय मुंडे सक्रिय झाले असून अजित पवार यांची भेट घेतल्यानंतर त्यांनी आज दिल्लीत जाऊन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचीही सदिच्छा भेट घेतली.

## वाल्मिक कराडचा उच्च न्यायालयाने जामीन फेटाळला

- **उच्च न्यायालयाचा मोठा झटका संतोष देशमुख हत्या प्रकरण**

**छत्रपती संभाजीनगर :** मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येप्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराड याला मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाकडून मोठा धक्का बसला आहे. या प्रकरणात कराडने दाखल केलेला जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळून लावला आहे. वाल्मिक कराडने औरंगाबाद खंडपीठात जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. या अर्जावर १२ डिसेंबर रोजी सकाळी ११.३० वाजल्यापासून सायंकाळी ६ वाजेपर्यंत सविस्तर सुनावणी झाली. मात्र, सरकारी पक्षाचा युक्तीवाद त्या दिवशी पूर्ण होऊ शकला नव्हता. त्यामुळे न्यायालयाने पुढील सुनावणी १६ डिसेंबर रोजी ठेवली होती. त्यानंतर आज अंतिम निर्णय देत न्यायालयाने कराडचा जामीन अर्ज नामंजूर केला.



ही सुनावणी न्यायमूर्ती सुशिल एम. घोडेस्वार यांच्या न्यायालयात पार पडली. संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी केज पोलिस ठाण्यात वाल्मिक कराड आणि त्याच्या साथीदारांविरोधात खून तसेच मकोका कायद्याअंतर्गत गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ३१ डिसेंबर २०२४ पासून वाल्मिक कराड कोठडीत आहे. दीर्घकाळ कोठडीत असल्याने आणि आपल्याला जामीन मिळावा यासाठी त्याने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, या प्रकरणातील गुन्ह्याचे गांभीर्य आणि उपलब्ध पुरावे पाहता न्यायालयाने त्याला दिलासा देण्यास नकार दिला आहे.

## टीसीएस या कंपनीच्या कर्मचारी कपातीचे पडसाद विधिमंडळात

**पुणे :** देशातील माहिती तंत्रज्ञान (आयटी) क्षेत्रातील आघाडीच्या टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस या कंपनीच्या कर्मचारी कपातीवरून बराच काळ गदारोळ सुरू आहे. याचे पडसाद विधिमंडळाच्या अधिवेशनातही उमटले.

टीसीएसकडून जगभरात एकूण मनुष्यबळापैकी दोन टक्के मनुष्यबळाची फेररचना करण्याची घोषणा करण्यात आली होती. टीसीएसच्या एकूण मनुष्यबळापैकी १२ हजार कर्मचाऱ्यांच्या कपातीची प्रक्रिया चालू आर्थिक वर्षात सुरू आहे. आयटीनगरी असलेल्या पुण्यात टीसीएसकडून नेमकी किती कपात केली जाणार हे जाहीर करण्यात आले नव्हते. मात्र, आयटी क्षेत्रातील कर्मचारी संघटनेने हा आकडा सुमारे अडीच हजार असल्याचा दावा केला. याच वेळी टीसीएसमधून कपात करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या तक्रारी कामगार विभागाकडे येण्यास सुरुवात झाली. याप्रकरणी कामगार विभागाने टीसीएसला काही नोटिसाही बजावल्या. यावर कामगार विभागासमोर सुनावणी झाली असून, त्यावरील निर्णय अद्याप प्रलंबित आहे.

विधिमंडळातील प्रश्न हे कर्मचारी कपातीसोबतच कृत्रिम प्रज्ञेमुळे (एआय) आयटीतील नोकऱ्यांवर गदा येत आहे का, अशी विचारणा करणारे होते. यावर कामगारमंत्री आकाश फुंडकर यांनी सभागृहात उत्तर दिले. यासाठी त्यांनी टीसीएसकडून कामगार विभागाला मिळालेल्या उत्तराचा आधार घेतला. फुंडकर म्हणाले होते, की टीसीएसने चालू आर्थिक वर्षातील पहिल्या सहामाहीत पुण्यात केवळ ३७६ कर्मचाऱ्यांची कपात केली आहे. या कर्मचारी कपातीचा कृत्रिम प्रज्ञेशी कोणताही संबंध नाही. कंपनीकडून मनुष्यबळ पुनर्रचना केली जात असून, त्यातून ही कपात करण्यात आली आहे. प्रामुख्याने मध्यम ते वरिष्ठ स्तरावरील कर्मचाऱ्यांचा त्यात समावेश आहे. सरकारकडून आयटी क्षेत्रातील घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. राज्याची अर्थव्यवस्था आणि रोजगारासाठी हे क्षेत्र महत्त्वाचे आहे.

कामगारमंत्र्यांच्या या उत्तरावर फोरम फॉर आयटी एम्प्लॉईज संघटनेने प्रश्न उपस्थित केले आहेत. संघटनेने म्हटले आहे, की राज्य सरकारने टीसीएसमधील कर्मचारी कपातीची सखोल चौकशी करावी. कर्मचाऱ्यांची काहीही चूक नसताना त्यांना कामावरून कमी केले जात आहे. आयटी क्षेत्रातील आघाडीची कंपनी असा प्रकार कसा करू शकते, कंपनीने कपात केलेले काही कर्मचारी १० ते १५ वर्षे अथवा त्यापेक्षाही जास्त काळ सेवेत असलेले होते. त्यांनी एका दिवसात कुठे जायचे? अमानवी पद्धतीने ही कपात करण्यात आली असून, कर्मचाऱ्यांना नुकसानभरपाईही देण्यात आलेली नाही. कंपनीने अनेक कर्मचाऱ्यांकडून जबरदस्तीने राजीनामे घेतले असून, त्यांचा समावेश या कपातीच्या आकडेवारीत नाही. या कर्मचाऱ्यांचे हक्क नाकारून त्यांच्यावर ही कपात लादण्यात आली आहे. राज्य सरकारने यात हस्तक्षेप करण्याची आवश्यकता आहे.

टीसीएसने कर्मचारी कपातप्रकरणी कामगार विभागाला उत्तर दिले आहे. त्यात म्हटले आहे, की कर्मचारी कपातीचा एआयशी काहीही संबंध नाही. जगातील एआय आधारित तंत्रज्ञान सेवा पुरवठादार म्हणून कंपनी आपले स्थान निर्माण करीत आहे. या दृष्टीने कर्मचाऱ्यांना मनुष्यबळाचे प्रशिक्षण आणि त्यांच्या कौशल्यविकासावर भर देण्यात येत आहे. एआयचा स्वीकार हा मनुष्यबळाला पर्याय म्हणून करण्यात आलेला नाही. उलट एआयचा स्वीकार करून त्याच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी कुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे. त्यामुळे एआयचा स्वीकार करताना मनुष्यबळाच्या कौशल्यविकासाला आम्ही प्राधान्य देत आहोत.

## पुणे महापालिकेच्या प्रारुप मतदार यादीवर ४७ हजारांहून अधिक हरकतींची दखल !

**पुणे :** महापालिका निवडणुकीसाठी प्रशासनाने प्रसिद्ध केलेल्या प्रारूप मतदारयादीवर नोंदविण्यात आलेल्या ४७ हजारांहून अधिक हरकतींची दखल घेतली. प्रशासनाने या हरकतींची शहानिशा करून अंतिम मतदारयादी प्रसिद्ध केली आहे. यामुळे प्रारूप मतदारयादीत दाखविलेली ९२ हजार ४६६ मतदारांची नावे अंतिम मतदारयादीत योग्य प्रभागात गेली आहेत. महापालिकेचे निवडणूक विभागाचे उपायुक्त प्रसाद काटकर यांनी ही माहिती दिली.

महापालिका निवडणुकीची घोषणा राज्य निवडणूक आयोगाने सोमवारी केली. पुणे महापालिकेने निवडणुकीसाठी तयार केलेल्या प्रारूप मतदारयादीवर सुमारे ६५ हजार हरकती होत्या. यामध्ये कुटुंबातील एका व्यक्तीचे नाव एका प्रभागात, तर इतरांची नावे दुसऱ्या प्रभागात टाकण्यात आल्याचे प्रकार होते. एका प्रभागातील नावे दुसऱ्या विधानसभा, लोकसभा मतदारसंघात गेल्याच्याही चुका होत्या. हरकती नोंदविण्याच्या मुदतीत मतदारांनी मोठ्या प्रमाणावर आक्षेप नोंदविले.

## चार महामार्गांना जोडणाऱ्या ४५ किलोमीटर लांबीच्या भूमिगत रस्त्याच्या पर्यायाची चाचपणी, वाहतूक कोंडी फोडण्यासाठी पीएमआरडीएचा पुढाकार

**पुणे :** शहर आणि परिसरातील वाहतुकीची कोंडी सोडविण्याच्या दृष्टीने जिल्ह्यातील चार प्रमुख महामार्गांना जोडणाऱ्या ४५ किलोमीटर लांबीच्या भूमिगत रस्त्याच्या पर्यायाची चाचपणी सुरू झाली आहे. या संदर्भातील आराखडा सल्लागार कंपनीने पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (पीएमआरडीए) दिला आहे. त्यासाठी २० हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

शहरातील दळणवळण गतिमान करण्यासाठी येरवडा ते कात्रज बोगदा मार्ग (ट्वीन टनेल) करण्याच्या दृष्टीने पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या व्यवहार्यतेचा अभ्यास करण्यासाठी सल्लागार संस्थेची नियुक्ती केली आहे. त्यानुसार सर्वेक्षण पूर्ण करून प्रारूप आराखडा 'पीएमआरडीए'ला सादर करण्यात आला आहे.

महापालिकेच्या विकास आराखड्यात तळजाई टेकडी आणि वेताळ टेकडी या दोन्ही ठिकाणी भूमिगत रस्त्यांचा समावेश करण्यात आला आहे. प्रारूप आराखड्यामध्ये या दोन्ही रस्त्यांचा समावेश करण्यात आला. तसेच, स्वारगेट, जगताप डेअरी आणि कात्रज या तीन ठिकाणी बोगद्याचा पर्याय देण्यात आला. यामुळे उपनगरांसह मध्यवर्ती भागातील वाहतूक कोंडी कमी होईल, असा दावा करण्यात आला.

भूमिगत रस्ता करताना भूमिगत मेट्रो मार्गिकेला बाधा येणार नाही, अशा पद्धतीने त्याची रचना करण्यात आली. जमिनीखाली तीस मीटर अंतरावरून रस्ता प्रस्तावित करण्यात आला असून, तो सहापदरी असणार आहे. त्यासाठी तीन टप्पे प्रस्तावित आहेत. या प्रस्तावाला 'पीएमआरडीए'ने मान्यता दिल्यानंतर तो अंतिम मान्यतेसाठी राज्य शासनाकडे पाठविण्यात येणार आहे.

दरम्यान, शहर आणि परिसराचा झपाट्याने होत असलेल्या विस्ताराच्या पार्श्वभूमीवर पुणे महानगर क्षेत्रात २२० प्रकल्प हाती घेण्यात आले असून, त्यासाठी ३२ हजार ५२३ कोटींच्या निधीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या आठवड्यात मंजुरी दिली आहे.

## संपादकीय

# माणिकराव गोत्यात!

क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे गोत्यात आले आहेत. 'गृहकर्तृत्वा'मुळे त्यांच्या आमदारकी आणि मंत्रिपदावर टांगती तलवार आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे शासकीय सदनिकेचा लाभ घेण्याच्या प्रकरणात राज्याचे क्रीडामंत्री, राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) नेते माणिकराव कोकाटे यांना कनिष्ठ न्यायालयाने सुनावलेली दोन वर्षांची शिक्षा सत्र न्यायालयाने कायम ठेवली. या निकालाने लोकप्रतिनिधी कायद्यातील तरतुदीनुसार कोकाटे यांची आमदारकी रद्दबातल ठरणार आहे. विधिमंडळ सचिवांनी याबाबतची अधिसूचना काढल्यानंतर कोकाटे यांना मंत्रिपद आणि आमदारकी गमवावी लागणार आहे.

बनावट दस्तावेजाच्या आधारे अल्प उत्पन्न गटातून शासकीय कोट्यातील सदनिकेचा लाभ घेत शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी कनिष्ठ न्यायालयाने फेब्रुवारीमध्ये मंत्री माणिकराव कोकाटे आणि त्यांचे बंधू विजय कोकाटे यांना दोन वर्षांचा कारावास आणि प्रत्येकी ५० हजार रुपये दंड अशी शिक्षा ठोठावली होती. अपिलात सत्र न्यायालयाने कोकाटे बंधूंना जामीन मंजूर करून शिक्षेच्या अंमलबजावणीस स्थगिती दिली होती. सदनिका घोटाळ्याचा खटला १९९७ पासून सुरू होता. ज्यामध्ये आता न्यायालयाने ठोस निकाल दिला आहे. हे संपूर्ण प्रकरण १९९५ मधील असून मुख्यमंत्री स्वेच्छाधिकार योजनेच्या १० टक्के राखीव कोट्यातून नाशिकमधील 'कॅनडा कॉर्नर'सारख्या उच्चभ्रू परिसरात सदनिका मिळवण्यासाठी बनावट कागदपत्रांचा वापर केल्याचा आरोप कोकाटे बंधूंवर होता. अल्प उत्पन्न गटात मोडत नसतानाही उत्पन्न कमी दाखवून शासनाची फसवणूक केल्याचे तपासात सिद्ध झाले होते. माजी मंत्री तुकाराम दिघोळे यांनी या गैरव्यवहाराविरोधात तक्रार दाखल केली होती. त्यानंतर नाशिकच्या सरकारवाडा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला होता.

जिल्हा व सत्र न्यायाधीश पी. एम. बदर यांनी कोकाटे बंधूंना सुनावलेल्या शिक्षेची अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत. न्यायालयाने या प्रकरणी निरीक्षण नोंदवताना म्हटले आहे की, ज्या सदनिका कोकाटे यांनी घेतल्या, त्या निकषानुसार नव्हत्या आणि यात शासनाची स्पष्ट फसवणूक झाली आहे. या निकालामुळे कोकाटे बंधूंना कधीही अटकेचे समन्स बजावले जाण्याची शक्यता आहे. या आधी कोकाटे यांनी वरच्या न्यायालयात दाद मागितल्यामुळे त्यांच्या शिक्षेला तात्पुरती स्थगिती मिळाली होती. मात्र आता सत्र न्यायालयाने मूळ शिक्षा कायम ठेवल्याने त्यांच्या अडचणीत प्रचंड वाढ झाली आहे. तक्रारदार तुकाराम दिघोळे यांची कन्या अंजली दिघोळे-राठोड यांनी या प्रकरणात हस्तक्षेप याचिका दाखल करून कोकाटे यांना जामीन मिळू नये म्हणून उच्च न्यायालयातही धाव घेतली आहे. लोकप्रतिनिधी कायद्यानुसार जर एखाद्या आमदार किंवा खासदाराला २ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीची शिक्षा झाली, तर त्यांचे सदस्यत्व तातडीने रद्द करण्याची तरतूद आहे.

या नियमामुळे माणिकराव कोकाटे यांना आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागू शकतो. यापूर्वी राहुल गांधी यांच्या मानहानी प्रकरणात अशाच प्रकारची कारवाई झाली होती. ज्याचा दाखला आता या प्रकरणात दिला जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे मंत्री असलेले कोकाटे सध्या राजकीयदृष्ट्या कोंडीत सापडले आहेत. कोकाटे यांच्या वकिलांनी अपिलात जामिनासाठी प्रयत्न सुरू केले असले तरी, नैतिकतेच्या आधारावर त्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे. यापूर्वी कोकाटे यांनी कृषिमंत्री असताना केलेल्या काही विधानांमुळे महायुती सरकारवर मोठी नामुष्की ओढवली होती. शेतकरी कर्जमाफीवर केलेल्या विधानामुळे तसेच विधिमंडळातील सभागृहात थेट रमी हा ऑनलाईन गेम खेळताना दिसल्यामुळे त्यांच्यावर टीकेची झोड उठली होती. परिणामी मुख्यमंत्री फडणवीस यांना कोकाटे यांचे खाते बदलावे लागले.

त्यांची कृषिमंत्रिपदावरून उचलबांगडी करून क्रीडामंत्र्यांची जबाबदारी सोपवण्यात आली. राज्यातील महापालिका निवडणुकांचे बिगुल वाजल्याने राजकीय हालचालींना प्रचंड वेग आला आहे. त्यात कोकाटेसारख्या प्रकरणामुळे राष्ट्रवादी अजित पवार गटाची डोकेदुखी वाढली आहे. आधीच पार्थ पवार प्रकरणाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष गोत्यात आला असताना त्यात कोकाटे प्रकरणाची भर पडली आहे. एकूण सध्या राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे ग्रह फिरलेले दिसतात. घोटाळेबाजांचा पक्ष अशी या पक्षाची भलामण होताना दिसते आहे. दोषसिद्धीला स्थगिती मिळावी म्हणून कोकाटे यांना उच्च न्यायालयात धाव घ्यावी लागणार आहे. तेथे दिलासा मिळाला तरच कोकाटे यांची आमदारकी व मंत्रिपद वाचू शकेल. बनावट कागदपत्रांच्या आधारे सदनिका लाटून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी कनिष्ठ न्यायालयाने ठोठावलेली २ वर्षांची शिक्षा सत्र न्यायालयाने कायम केल्यानंतर तरी आता सरकारने कोकाटे यांची मंत्रिपदावरून हकालपट्टी करावी. शेतक-यांचा अवमान करून झाला, ऑनलाईन पत्ते झाले आणि आता शासनालाच चुना लावल्याप्रकरणी शिक्षाही कायम झाल्याने कायम नैतिकतेच्या गप्पा हाणत नाकाने कांदे सोलणारे हे सरकार त्यांना आणखी किती दिवस वाचवतेय ते बघायचे अशी पोस्ट आमदार रोहित पवार यांनी केली आहे.

माझा न्याययंत्रणेवर पूर्ण विश्वास आहे. त्यामुळे माझ्याविरोधात कोकाटे यांनी दाखल केलेला कथित मानहानीचा दावाही न्यायालय असाच फेटाळून लावेल असे रोहित पवार यांनी म्हटले आहे. कायमच चुकीची कामं करणा-यांची पाठराखण करणा-या भाजपची न्यायालयाकडून चोहोबाजूने कोंडी होताना दिसते. मंत्री शिरसाठ यांनाही न्यायालयाने असेच फटकारले, तरी सरकार त्यांना वाचवताना दिसते. नॅशनल हेरॉल्ड प्रकरणी ईडीने दाखल केलेले आरोपपत्रही न्यायालयाने फेटाळून लावले. त्यामुळे ईडीच्या आडून राजकीय हल्ले करणा-या सरकारचा मुखवटा फाटला गेला आहे. आता दिल्लीच्या कोर्टात टांगली गेलेली स्वत:ची अब्रू वाचवण्यासाठी तरी भाजपाने माफी मागावी असे रोहित पवार यांनी म्हटले आहे. जिल्हा सत्र न्यायालयानेही शिक्षा कायम ठेवल्याने कोकाटेंच्या राजकीय भवितव्यावर भलेमोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. न्यायालयीन निर्णयानंतर कोणत्याही क्षणी कोकाटेंवर अटक वॉरंट निघू शकते.

# मेस्सी मॅजिक!

जगविख्यात फुटबॉलपटू, फुटबॉल रसिकांचा देव लिओनेल मेस्सी सध्या 'गोट टूर ऑफ इंडिया' अंतर्गत भारत दौ-यावर आहे. अर्जेंटिनाचा तारांकित फुटबॉलपटू ३८ वर्षीय मेस्सीबरोबर त्याचे बार्सिलोना फुटबॉल क्लबमधील सहकारी लुईस सुआरेझ, अर्जेंटिनाचा फुटबॉलपटू रॉड्रिगो डी पॉल हेदेखील भारत दौ-यावर आहेत. या दौ-यात त्याच्या कोलकाता, हैदराबाद, मुंबई आणि दिल्ली या महानगरांच्या भेटी ठरल्या होत्या. मेस्सीची जादू (मॅजिक) जगभरात आहे तशीच ती भारतातही आहे. त्याची झलक पाहण्यासाठी फुटबॉलप्रेमी जीवाचे रान करीत आहेत. कोलकातावासीयांचे फुटबॉल प्रेम प्रसिद्ध आहे. 'गोट टूर'अंतर्गत भल्या पहाटे मेस्सी कोलकात्यात दाखल झाला होता. भारतीय फुटबॉलचे माहेरघर मानल्या जाणा-या सॉल्ट लेक स्टेडियममध्ये चाहत्यांनी मेस्सीची झलक पाहण्यासाठी गर्दी केली होती. मोठ्या दराची तिकिटे काढून रसिक स्टेडियममध्ये उपस्थित होते.

४ हजार रुपयांपासून ते १० हजार रुपयांपर्यंत या तिकिटांचा दर होता. ब्लॅकमध्ये २० हजार रुपये दराने तिकिटे विकली गेल्याचे सांगण्यात येते; परंतु चाहत्यांना मेस्सीची झलक पहावयास मिळाली नाही.

मेस्सी मैदानात आला. त्याला आयोजक, सेलिब्रिटी आणि सुरक्षा कर्मचा-यांनी वेढले होते. मेस्सी मैदानावर थोडे अंतर चालत गेला आणि जयघोष करणा-या प्रेक्षकांना अभिवादन केले. सुरक्षारक्षकांचा वेढा आणि सेलिब्रिटी सेल्फीसाठी गर्दी करत असल्यामुळे स्टेडियममधील स्क्रीनवर मेस्सीची झलक पहावयास मिळाली नाही त्यामुळे चाहत्यांच्या निराशेचे संतापात रुपांतर झाले. प्रेक्षकांनी मैदानावर बाटल्या फेकल्या, खुर्च्यांची मोडतोड केली. काही ठिकाणी जमावाने अडथळे तोडून मैदानात घुसण्याचा प्रयत्न केला. या गोंधळामुळे मेस्सी मैदानाची फेरी पूर्ण न करताच नियोजित वेळेआधीच मैदानाबाहेर निघून गेला. चाहत्यांचा संताप अनावर झाल्याने मेस्सीला सुरक्षितरित्या मैदानाबाहेर काढण्यात आले. पहिल्या टप्प्यातच मेस्सीच्या दौ-याला गालबोट लागले. या सा-या प्रकाराबद्दल पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी माफी मागितली. गैरव्यवस्थापनामुळे मी व्यथित आहे, असे त्या म्हणाल्या. मुख्यमंत्र्यांनी या घटनेची चौकशी करण्यासाठी उच्चस्तरीय चौकशी समिती नियुक्त केली आहे.

कोलकाता उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश असिम कुमार हे या समितीचे अध्यक्ष आहेत. समिती या घटनेची सखोल चौकशी करून जबाबदारी निश्चित करेल आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी उपाययोजना सुचवेल. पोलिसांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून आयोजक शताद्रु दत्ता याला अटक केली आहे. काही जणांनी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्याही अटकेची मागणी केली आहे. हिरमोड झालेल्या चाहत्यांच्या तिकिटाचे पैसे परत करण्याचा निर्णय आयोजकांनी घेतला आहे. असे प्रकार वारंवार का घडतात ते कळत नाही. कारण ढिसाळ नियोजनामुळे देशात अनेक वेळा अप्रिय घटना घडल्या आहेत. जिथे गर्दी तिथे चेंगराचेंगरी असे प्रकार तर नित्याचे झाले आहेत. कोलकात्यानंतर मेस्सी हैदराबादेत दाखल झाला. तेथील कार्यक्रमानंतर मुंबईत त्याचे आगमन झाले. देशाच्या फुटबॉल विकासात भर घालण्याच्या तसेच राज्यातील फुटबॉलपटूंना घडविण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र इन्स्टिट्युटशन ऑफ ट्रान्सफॉर्मेशन (मित्र) आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली तयार केलेल्या 'प्रोजेक्ट महादेवा' उपक्रमाचे रविवारी मेस्सीच्या हस्ते अनावरण करण्यात आले. 'प्रोजेक्ट महादेवा'च्या पहिल्या तुकडीसाठी निवड करण्यात आलेल्या ६० मुलांना मेस्सी आणि मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते ५ वर्षाची पूर्ण शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. या उपक्रमाला 'जेएसडब्ल्यू'चे पार्थ जिंदाल यांनी ७५ लाख तर महिंद्राने ९९ लाख ९९ हजार रुपयांचे अनुदान दिले आहे. राज्याच्या कानाकोप-यातील प्रतिभावान फुटबॉलपटूंना शोधणे, त्यांना घडविणे आणि सक्षम करणे हा 'महा-देवा' उपक्रमाचा उद्देश आहे. त्यानंतर वानखेडे स्टेडियमवर मेस्सी दाखल झाला. एरव्ही 'सचिन-सचिन'च्या जयघोषाने निनादणारे वानखेडे 'मेस्सी-मेस्सी'च्या घोषणांनी भारून गेले. मेस्सीने संपूर्ण वानखेडेला फेरी मारत चाहत्यांना अभिवादन केले. त्याने स्वत:ची स्वाक्षरी केलेले फुटबॉल चाहत्यांच्या दिशेने मारले. कोट्यवधी चाहत्यांच्या मनावर राज्य करणा-या मेस्सीला 'याची देही, याची डोळा' पाहण्याचे भाग्य मुंबईकरांना लाभले. कोलकाता येथे सुरक्षाव्यवस्थेचे तीनतेरा वाजलेले असताना मुंबईत कसे चित्र राहील याची चिंता होती; परंतु मुंबई पोलिस आणि मुंबईतील दर्दी फुटबॉलप्रेमींनी या सोहळ्याचे यशस्वी आयोजन करून दाखवले. मेस्सीला सचिनने १० नंबरची जर्सी भेट दिली. मेस्सीने सचिनला फुटबॉल भेट दिला. मेस्सीच्या १० क्रमांक असलेल्या अर्जेंटिना, बार्सिलोना आणि इंटर मियामीच्या जर्सींनी वानखेडेचा परिसर फुलून गेला होता. २०११ मध्ये मेस्सी कोलकाता येथे सॉल्ट लेक स्टेडियममध्ये सामना खेळण्यासाठी आला होता. त्यानंतर तो प्रथमच १४ वर्षांनी भारतात आला आहे. २०२२ मध्ये मेस्सीच्या नेतृत्वाखाली अर्जेंटिनाने विश्वचषक जिंकला होता त्यामुळे मेस्सीची गणना फुटबॉलमधील महान खेळाडूंमध्ये केली जाऊ लागली. रविवारी मेस्सीने वानखेडेवरील काही लहान मुलांसह फुटबॉल खेळण्याचा आनंद लुटला. या अनोख्या क्षणांमुळे भविष्यात भारतातील युवकांना फुटबॉलकडे वळण्याची प्रेरणा मिळेल यात शंका नाही. मेस्सीने भारताचा माजी फुटबॉल कर्णधार सुनील छेत्रीसोबत गप्पा मारल्या. मुख्यमंत्री फडणवीस यांना अर्जेंटिनाची जर्सी भेट दिली. वानखेडेवर दोन महान खेळाडू मेस्सी आणि सचिन तेंडूलकर यांना एकाच मंचावर पाहण्याचे भाग्य मुंबईकरांना मिळाले.

# 'महासंग्रामाचे बिगुल वाजले'

सुमारे पावणेचार वर्षांनंतर राज्यातील बहुतेक महानगरपालिकांच्या निवडणुकांना मुहूर्त सापडला आहे. ओबीसी आरक्षणाचा प्रश्न सुप्रीम कोर्टात गेल्यानंतर फेब्रुवारी २०२२ मध्ये पार पडणा-या निवडणुका लांबणीवर पडल्या होत्या. आता राज्यातील २९ महापालिकांचा महासंग्राम १५ जानेवारीला रंगणार असून १६ जानेवारीला मतमोजणी होणार आहे. राज्यात सोमवारपासून आचारसंहिता लागू झाली असून निवडणुकीची घोषणा झाल्यामुळे इच्छुकांनी पक्षश्रेष्ठींकडे धाव घेतली आहे. मुंबई महानगरपालिकेच्या २२७ जागांसह एकूण २ हजार ८६९ जागांसाठी ही निवडणूक होत आहे. सह्याद्री अतिथिगृहात आयोजित पत्रकार परिषदेत महानगरपालिका निवडणुकांची घोषणा राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी केली. यावेळी आयोगाचे सचिव सुरेश काकाणी उपस्थित होते. सर्व महानगरपालिकांची निवडणूक प्रक्रिया सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निकालाच्या अधीन राहून राबविण्यात येत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकीची अधिसूचना १६ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध होईल. उर्वरित सर्व २८ महानगरपालिकांची अधिसूचना १८ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. अधिसूचना प्रसिद्ध करण्याची प्रक्रिया संबंधित महानगरपालिका आयुक्त आपापल्या स्तरावर पार पाडतील. सर्व महानगरपालिकांसाठी १५ जानेवारी रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होईल.

राज्यातील २९ महानगरपालिकांपैकी जालना आणि इचलकरंजी या दोन नवनिर्मित महानगरपालिका आहेत. ५ महानगरपालिकांची मुदत २०20 मध्ये संपली आहे. सर्वाधिक १८ महानगरपालिकांची मुदत २०२२ मध्ये संपली होती, तर ४ महानगरपालिकांची मुदत २०२३ मध्ये संपली आहे. महानगरपालिका निवडणुकांसाठी राज्यात एकूण ३ कोटी ४८ लाख ७८ हजार १७ मतदार असून त्यासाठी सुमारे ३९ हजार १४७ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. या निवडणुकांसाठी पुरेशा इलेक्ट्रॉनिक मतदार यंत्राची (ईव्हीएम) व्यवस्था करण्यात आली आहे. त्यात ४३ हजार ९५८ कंट्रोल युनिट आणि ८७ हजार ९१६ बॅलेट युनिटची उपलब्धता करण्यात आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी संगणकीय प्रणालीद्वारे नामनिर्देशनपत्रे व शपथपत्रे दाखल करण्याची सुविधा राज्य निवडणूक आयोगाने उपलब्ध करून दिलेली आहे. परंतु विविध राजकीय पक्ष, नगर परिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांतील उमेदवारांची मागणी लक्षात घेऊन महानगरपालिका निवडणुकीत पारंपरिकरीत्या ऑफलाईन पद्धतीनेच नामनिर्देशनपत्रे दाखल करता येणार आहेत. मतदान केंद्रावर ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, तान्ह्या बाळासह असणा-या स्त्रिया, गरोदर स्त्रिया आदींना मतदानासाठी प्राधान्य दिले जाईल. दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी मतदान केंद्रावर कायमस्वरूपी रॅम्पची सुविधा नसल्यास तात्पुरती सुविधा उभारली जाईल. व्हीलचेअरचीही व्यवस्था असेल.

मतदान केंद्रावर विजेची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, सावलीची सुविधा, शौचालयाची व्यवस्था उपलब्ध करून दिली जाईल. महिला मतदारांची संख्या जास्त असलेल्या ठिकाणी सर्व निवडणूक अधिकारी, कर्मचारी, पोलिस कर्मचारी महिला असतील. असे मतदान केंद्र 'पिंक मतदान केंद्र' म्हणून ओळखले जाईल. मतदान केंद्राच्या आत मतदारांना मोबाईल नेण्यास बंदी असेल. महानगरपालिकेच्या निवडणुकांसाठी सुमारे २९० निवडणूक निर्णय अधिकारी आणि सुमारे ८७० सहाय्यक निवडणूक निर्णय अधिका-यांची पूर्तता करण्यात आली आहे. सुमारे १ लाख ९६ हजार ६०५ निवडणूक अधिकारी-कर्मचा-यांची व्यवस्था करण्यात आली आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून संबंधित महानगरपालिका क्षेत्रात आचारसंहिता लागू झाली आहे. महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात ही आचारसंहिता लागू असली तरी अन्य ठिकाणी महानगरपालिकेच्या मतदारांवर प्रभाव पाडणारी घोषणा किंवा कृती करता येणार नाही. आचारसंहिता लागू झाल्यामुळे शासनाला महानगरपालिका कार्यक्षेत्राशी संबंधित धोरणात्मक निर्णय घेता येणार नाहीत. नैसर्गिक आपत्तीबाबत करावयाच्या उपाययोजना किंवा मदतीसंदर्भात आचारसंहितेची आडकाठी असणार नाही. राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी निर्गमित केलेल्या आदेशानुसार आचारसंहितेचे पालन करणे आवश्यक असेल.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या प्रचार समाप्ती संदर्भात संबंधित विविध अधिनियमांमध्ये वेगवेगळ्या तरतुदी आहेत. जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर मुद्रित, इलेक्ट्रॉनिक आणि समाज माध्यमांसह कुठल्याही माध्यमांद्वारे प्रचारविषयक जाहिराती प्रसिद्ध किंवा प्रसारित करता येणार नाहीत. राखीव जागांवरील उमेदवारांना नामनिर्देशन पत्रासोबत जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असते. जात प्रमाणपत्र असेल परंतु जातवैधता प्रमाणपत्र जोडले नसेल तर जात पडताळणी समितीकडे जातवैधता प्रमाणपत्रासाठी सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत किंवा अर्ज केला असल्याचा पुरावा देणे आवश्यक राहील. राज्यातील नागरी निवडणुकांना विलंब होण्याचे मुख्य कारण म्हणजे ओबीसी आरक्षणाचा मुद्दा आणि मुंबईतील प्रभागांची पुनर्रचना हे आहे. निवडणुका घेण्यास विलंब होण्यामागे अनेक कारणे होती. वॉर्ड सीमानिर्धारणाचे आव्हान आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांसाठी जागांच्या आरक्षणाबाबतची चिंता हा एक प्रमुख मुद्दा होता. या व्यतिरिक्त प्रभागांची संख्या आणि प्रत्येक प्रभागातील नगरसेवकांच्या संख्येबाबत सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या कायदेशीर प्रकरणांमुळे ही प्रक्रिया थांबली होती. राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुका सोमवारी जाहीर होतील अशी कुणकुण होतीच.

कारण सोमवारी सकाळपासूनच राज्य शासनाने शासन निर्णय जारी करण्याचा सपाटा लावला होता. सोमवारी दिवसभरात ५० हून अधिक शासन निर्णय जारी करण्यात आले. मुंबई महापालिका क्षेत्रातील म्हाडा इमारतींसाठी संयुक्त पुनर्विकास धोरणासह ज्येष्ठ नागरिकांसाठी धोरण आणि निधी वाटपासंदर्भातील शासन निर्णयांचा समावेश आहे. राज्यात हिंदी सक्तीबाबत त्रिभाषा धोरण राबविण्यासाठी नेमण्यात आलेल्या डॉ. नरेंद्र जाधव समितीला अहवाल सादर करण्यास एक महिन्याची मुदतवाढ देण्यात आली आहे. महापालिकांच्या निवडणुकीची घोषणा झाल्याने निवडणुकीत फटका बसू नये यासाठी सावध भूमिका घेत राज्य सरकारने जाधव समितीला मुदतवाढ दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. ब-याच काळानंतर महानगरपालिका निवडणुका होत असल्याने त्या निर्विघ्नपणे कशा पार पडतील यासाठी सामुदायिक प्रयत्न झाले पाहिजेत.

Marathi News paper 'Puneri Chalval' Editor ,Owner Sunil Balkisan Goyal Printed at Shree Samarth Printers, 483, Roshani Palace, Shop No 8, Shaniwar Peth, Dist - Pune - 411030 and Published by Varun Sunil Goyal from S. No-155,HussinShah Baba Nagar vishrantwadi Pune 411006 Editor -Sunil Balkisan Goyal

पुणेरी चळवळ हे मराठी साप्ताहिक मुद्रक, मालक, संपादक - सुनिल बालकिसन गोयल एवं प्रकाशक - वरुण सुनिल गोयलने श्री समर्थ प्रिंटर्स, ४०३ रोशनी पॅलेस, शॉप नं ८, शनिवार पेठ, जिल्हा-पुणे - ४११०३० (महाराष्ट्र) मुद्रीत कर शहर कार्यालय सं.नं.१५५, हुसेनशाह बाबानगर, प्रतिकनगर कार्यालया के बाजुमें येरवडा पुणे - ४११००६ ( महाराष्ट्र ) यहाँ प्रकाशित किया. संपादक- सुनिल बालकिसन गोयल
पुणेरी चळवळ मराठी साप्ताहिक मुद्रक, मालक, संपादक- सुनिल बालकिसन गोयल तसेच प्रकाशक - वरुण सुनिल गोयल यांनी श्री समर्थ प्रिंटर्स, ४०३ रोशनी पॅलेस , शॉप नं ८, शनिवार पेठ, जिल्हा-पुणे - ४११०३० (महाराष्ट्र) येथे छापुन शहर कार्यालय सं. नं. १५५, हुसेनशाह बाबानगर, प्रतिकनगर कार्यालया शेजारी येरवडा पुणे - ४११००६ ( महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक- सुनिल बालकिसन गोयल
अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या, लेख, व जाहीरात यांच्याशी मालक, संपादक सहमत असतीलच असे नाही. सदरचा वाद-विवाद पुणे न्यायलयाच्या कक्षेत

# पुणे महापालिकेचे सभागृह किती वर्षांनी उघडणार!

**पुणे** : पावणेचार वर्षांपेक्षा अधिक काळापासून रखडलेल्या राज्यातील महापालिकांच्या निवडणुकीची घोषणा सोमवारी राज्य निवडणूक आयोगाने केली. यामध्ये पुणे महापालिकेचाही समावेश असल्याने दीर्घ काळ प्रशासकीय राजवट असलेल्या महापालिकेत पुन्हा एकदा लोकप्रतिनिधी निवडले जाणार आहेत.

महापालिकेच्या सभागृहाची मुदत १४ फेब्रुवारी २०२२ ला संपल्यानंतर राज्य सरकारने महापालिकेचा कारभार प्रशासकाच्या हाती दिला होता. तेव्हा पासून महापालिकेचे सभागृह बंद होते. महापालिका आयुक्तांनाच प्रशासक म्हणून जबाबदारी देण्यात आली होती. महापालिकेची आगामी निवडणूक २०११ च्या जनगणनेनुसार तयार करण्यात आलेल्या प्रभागरचनेनुसार होणार आहे. ४१ प्रभागांमध्ये ही निवडणूक घेतली जाणार असून, १६५ सभासद निवडून जाणार आहेत. या निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर महापालिकेचे सभागृह पुन्हा सुरू होणार आहे.

महापालिकेची निवडणूक चार सदस्य प्रभाग पद्धतीने घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे. ४० प्रभाग चार सदस्यांचे असून एक प्रभाग पाच सदस्यांचा असणार आहे. १६५ सदस्यांमध्ये ८३ जागांवर महिला, तर ८२ जागा पुरुषांसाठी असणार आहेत. निवडणुकीसाठी ३५ लाख ५१ हजार ४६९ इतकी मतदारांची संख्या निश्चित करण्यात आली आहे. सर्वांत मोठा प्रभाग प्रभाग क्रमांक ३८ (बालाजीनगर-आंबेगाव-कात्रज) असून, या प्रभागाची लोकसंख्या १ लाख २३ हजार ९८१ इतकी आहे.

मतदानासाठी महापालिकेच्या १५ क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीत मतदान केंद्रांची संख्या निश्चित केली जात आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार प्रत्येक ९०० मतदारांमागे एक मतदान केंद्र उभारले जाणार आहे. त्यानुसार संपूर्ण शहरात सर्वसाधारण ३ हजार ९४६ मतदान केंद्रांची निर्मिती केली जात आहे.

मतदारांना सुलभ आणि सुरक्षित मतदान करता यावे, यासाठी आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन महापालिका प्रशासनाने केले आहे. विविध न्यायालयीन प्रक्रिया, आरक्षण, प्रभाग रचना आणि जनगणनेच्या मुद्द्यांमुळे निवडणूक लांबणीवर पडली होती. आता २०११ च्या जनगणनेनुसार तयार करण्यात आलेल्या प्रभाग रचनेवर आगामी निवडणूक होणार आहे.

पुणे महापालिका निवडणुकीसाठी १ जुलै २०२५ पर्यंत नोंदणी केलेल्या मतदारांनाच मतदान करता येणार आहे. राज्य निवडणूक आयोगाने मतदारांची यादी महापालिकेला पाठविली आहे. निवडणुकीसाठी मतदारांची संख्या ३५ लाख ५१ हजार ४६९ इतकी आहे. यामध्ये पुणे शहरातील आठ विधानसभा मतदारसंघ आहेत. त्यात कसबा पेठ, शिवाजीनगर, कोथरूड, वडगाव शेरी, पुणे कॅन्टोन्मेंट, हडपसर, पर्वती आणि खडकवासला मतदार संघाचा समावेश आहे. तसेच पुणे महापालिकेच्या हद्दीत येणाऱ्या पुरंदर, शिरूर आणि भोर-वेल्हा या ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील मतदारांचा समावेश आहे.

# बहुजन विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर घाला

■ **अजित पवारांच्या निर्णयाला तीव्र विरोध**

**पुणे** : बार्टी, सारथी, महाज्योती अशा संस्थांतर्फे पीएच.डी. करण्यासाठी दिल्या जाणाऱ्या अधिछात्रवृत्तींची संख्या मर्यादित करण्यास विद्यार्थी संघटनांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. अधिछात्रवृत्तींची संख्या मर्यादित करून वंचित, बहुजन विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर घाला घातला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

एकाच कुटुंबातील पाच जण पीएच. डी. करायला लागले आहेत, असे सांगत उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी पीएच. डी. करण्यासाठी दिल्या जाणाऱ्या अधिछात्रवृत्तींची संख्या मर्यादित करण्यात येणार असल्याची माहिती अजित पवार यांनी विधिमंडळात दिली. तसेच या संदर्भात मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात येणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. या पार्श्वभूमीवर, आता विद्यार्थी संघटनांकडून या निर्णयाला विरोध दर्शवण्यात आला आहे.

शिक्षणाच्या बळावरच समाजातील वंचित घटक प्रगती करू शकतात, अन्यायाविरोधात उभे राहू शकतात आणि प्रस्थापित व्यवस्थेशी समतोल साधू शकतात, हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा स्पष्ट संदेश होता. हा विचार आज वंचित समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचला आहे. त्यामुळेच विद्यार्थी शिक्षण, उच्च शिक्षण, संशोधन आणि व्यावसायिक शिक्षणात पुढे जात आहेत. त्यासाठी त्यांना शिष्यवृत्ती, फेलोशिपसारख्या आधाराची नितांत गरज असते.

मात्र, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी वंचित समाजाने शिक्षण क्षेत्रात भरीव कामगिरी करू नये, अशी भूमिका घेतल्याचे स्पष्ट दिसत आहे. सारथी, बार्टी यांसारख्या स्वायत्त संस्थांचे महत्त्व कमी करून निधीवाटपात जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे वंचित समाजाला संशोधन व शिक्षणापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न होत आहे. या अन्यायकारक भूमिकेचा तीव्र निषेध असून, या विरोधात राज्यातील युवक रस्त्यावर उतरून आंदोलन करतील, असे युवा सेनेचे सहसचिव कल्पेश यादव यांनी सांगितले. अजित पवार यांनी यापूर्वीही पीएच.डी. करून काय दिवे लावणार, असा अवमानकारक प्रश्न विचारला होता. बार्टी, सारथी, महाज्योती या बहुजनांच्या शिक्षणासाठी उभ्या राहिलेल्या संस्था आहेत. मात्र, बहुजनांची मुले मुख्य प्रवाहात शिकू लागल्याने संकुचित, शिक्षणविरोधी मानसिकता पुन्हा एकदा उघड झाली आहे. कंपन्या, कारखानदारांना हजारो कोटींची कर्जमाफी, जमीन हडप करणाऱ्यांना सवलती मिळतात, मुद्रांकशुल्क माफ होते. सगळ्याच गोष्टी मंत्रालयातून चालणार असतील, तर या संस्थांच्या इमारती, अधिकारी, कर्मचारी कशासाठी असाही प्रश्न उपस्थित होतो. योजना जाहीर करायच्या, मग मर्यादा घालायच्या, नंतर समित्या नेमायच्या, शासन निर्णय काढायचे, मंत्रालयाच्या नावाखाली जबाबदारी ढकलायची असा प्रकार सुरू आहे, असे स्टुडंट हेल्पिंग हँडचे कुलदीप आंबेकर यांनी नमूद केले.

# वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी अनिरुद्ध अष्टपुत्रे यांना संचालक कार्यालयाकडून निरोप



**नागपूर** : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी तथा माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे उपसंचालक अनिरुद्ध अष्टपुत्रे यांना आज नागपूर-अमरावती माहिती संचालक कार्यालयात एका छोटेखानी कार्यक्रमात सेवानिवृत्तीपूर्व निरोप देण्यात आला.

गेल्या ३० वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर श्री. अष्टपुत्रे ३१ डिसेंबर २०२५ रोजी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत. या औचित्याने नागपूर माहिती संचालक कार्यालयात अनौपचारिक निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले. नागपूर-अमरावती विभागाचे माहिती संचालक डॉ. गणेश मुळे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

एकूण सेवेपैकी जवळपास अर्धा कालावधी एकूण ६ मुख्यमंत्री आणि १ उपमुख्यमंत्री यांचे जनसंपर्क अधिकारी म्हणून प्रभावीपणे कार्य करणारे श्री. अष्टपुत्रे यांच्यासोबत प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या माहिती विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला. जिल्हा माहिती अधिकारी व माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या मुख्यालयात वृत्त शाखेचे प्रमुख म्हणूनही त्यांनी आपल्या कामाची छाप सोडली आहे. यावेळी अनुक्रमे वर्धा,अकोला आणि नागपूर जिल्ह्यांचे जिल्हा माहिती अधिकारी मंगेश वरकड, हर्षवर्धन पवार आणि विनोद रापतवार यांनी तसेच निवृत्त जिल्हा माहिती अधिकारी अनिल गडेकर यांनी मनोगत व्यक्त केले.

## आशियातील सर्वात मोठे ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर महाराष्ट्रात उभारण्यात येणार

**मुंबई** : महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील प्रतिभा, पायाभूत सुविधा आणि व्यवसाय-अनुकूल वातावरण या तीन घटकांमुळे महाराष्ट्र ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटरसाठी अग्रगण्य ठरत आहे. यावर्षी जाहीर केलेले नवीन ॠछउ धोरण राज्यात उच्च मूल्याच्या, कौशल्याधारित रोजगारनिर्मितीस प्रोत्साहन देईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितले. ब्रुकफिल्ड कंपनीने मुंबईतील पवई येथे ६ एकर जागेवर २० लाख चौरस फूट भाडेतत्वावरील बांधकाम असलेला भव्य प्रकल्प उभारण्याची घोषणा केली आहे. या अंतर्गत बहुराष्ट्रीय बँकेचे आशियातील सर्वात मोठे ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर स्थापन केले जाणार आहे. हा करार २० वर्षांच्या कालावधीसाठी करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, या मोठ्या प्रकल्पांमुळे महाराष्ट्राच्या प्रगतीबाबत जागतिक स्तरावर विश्वास दृढ झाला आहे. आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या भविष्यातील गरजा पूर्ण करण्याबरोबरच, स्थिर आणि सक्षम वातावरण पुरवण्यास राज्य शासन तत्पर आहे. सदर प्रकल्प २०२९ पर्यंत पूर्ण होणार असून, यामध्ये १ अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक गुंतवणूक अपेक्षित आहे तसेच ३०,००० हून अधिक रोजगारनिर्मिती होणार आहे. हा प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व ब्रुकफिल्ड यांच्या नेतृत्वाखाली भागीदार बी. एस. शर्मा यांच्या सहकार्याने राबविण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

# शहरातील विकासकामे पूर्ण करताना उपयुक्ततेवर भर द्यावा

**नागपूर** : शहरातील विविध विकासकामे करताना त्याची भविष्यकालीन उपयुक्तता लक्षात घेऊन प्रकल्पांची निवड करावी. सद्यस्थितीत अपूर्ण असलेल्या प्रकल्पांसाठी जिल्हा नियोजन समिती योजनेतून निधीची तरतूद करून पूर्णत्वास न्यावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

विधान भवन येथे अमरावती महापालिकेच्या विविध प्रश्नांबाबत मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आढावा घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार संजय खोडके, आमदार सुलभा खोडके, आमदार रवी राणा, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी गुप्ता, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीम कुमार गुप्ता, ऊर्जा विभागाचे अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, अमरावती विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, महापालिका आयुक्त सौम्या शर्मा यांच्यासह संबंधित विभागांचे प्रमुख यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, अमरावती शहरातील विविध विकासकामे कार्यान्वित करताना आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन दिला जाईल. परंतु, निवड केलेले प्रकल्प हे भविष्यकालीन परिस्थिती लक्षात घेऊन निवडावे. शहरातील राजकमल रेल्वे ओव्हर ब्रीज उड्डाणपुलाच्या बांधकामाची मर्यादा संपुष्टात आलेली आहे. यामुळे वाहतूक कोंडी वाढलेली आहे. हा प्रश्न सोडविण्यासाठी महारेलकडून उड्डाणपुलाचे पूर्णत: मजबूत पुर्नबांधणी कशी करता येईल, याबाबत मार्गदर्शन घ्यावे. अमरावती येथे माहिती तंत्रज्ञान पार्क विकसित करण्यासाठी स्थानिकांचा प्रतिसाद पाहून प्रकल्प रोजगारक्षम बनेल यादृष्टीने प्रयत्न करावेत. शहरात नियमित पाणीपुरवठा करण्यासाठी अमृत योजने अंतर्गत प्रस्तावित जलशुध्दीकरण केंद्र, पाण्याच्या जलवाहिन्यांची कामे व पाणी टाकी बांधकाम आदी कामे तात्काळ पूर्ण करावीत.

# राजकारणातील राजयोगी, सुसंस्कृत नेता हरपला -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**लातूर** : लोकसभेचे माजी अध्यक्ष शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाने जवळपास सहा दशके राजकारणात सेवा देणारे राजयोगी, सुसंस्कृत, अजातशत्रू व्यक्तिमत्व हरपले. जात-धर्म-भाषा-पक्ष यासारख्या भिंतींच्या पलीकडे जाऊन त्यांनी सर्वपक्षीय नेत्यांशी जिव्हाळ्याचे संबंध निर्माण केले. त्यांच्या जाण्याने राज्याच्या, देशाच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाल्याची भावना व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवराज पाटील चाकूरकर यांना श्रद्धांजली अर्पण केली.

लातूर येथे शिवराज पाटील चाकूरकर यांच्या देवघर निवासस्थानी त्यांच्या पार्थिवाचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी अंत्यदर्शन घेतले. तसेच त्यांचे पुत्र शैलेश पाटील चाकूरकर, स्नुषा डॉ. अर्चना पाटील चाकूरकर व कुटुंबीयांचे सांत्वन केले. आमदार संभाजी पाटील निलंगेकर, माजी आमदार बसवराज पाटील, माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे यावेळी उपस्थित होते.

# वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविण्यावर भर देणार

**नागपूर** : उच्चशिक्षण घेणाऱ्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी व त्यांचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी राज्यातील सर्व वसतिगृहासाठी १२०० कोटी उपलब्ध करुन देण्यात आले असल्याचे प्रतिपादन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री संजय शिरसाट यांनी केले.

शहरातील सेंटर पाईंट हॉटेल येथे सामाजिक न्याय विभागातर्फे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी संवाद - देशाच्या भविष्याशी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी ते बोलत होते. सामाजिक न्याय विभागाचे प्रादेशिक उपायुक्त प्रसाद कुलकर्णी, सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांच्यासह सामाजिक न्याय विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

मंत्री संजय शिरसाट म्हणाले, विद्यार्थ्यांच्या मनात आत्मविश्वास निर्माण करण्यात येणार आहे. यामुळे ते प्रगती करू शकतील. त्यासाठी विद्यार्थ्यांनी सकारात्मकतेने शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा. या योजनांसाठी निधीची कमतरता पडणार नाही. विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष द्यावे. त्यासाठी लागणारे साहित्य तसेच सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याचा करण्यात येईल.


# दुर्दैवाने ती लढाई दिसत नाही : प्रकाश आंबेडकर



**पिंपरी** : 'मतदान केंद्रात बसलेले अधिकारी प्रत्येक बूथवर १०० ते १५० मते सत्ताधारी पक्षाला टाकतात अशी परिस्थिती आहे. मतांची चोरी होत नसून सत्ताधारी पक्षाला अधिक मते मिळण्याची परिस्थिती अधिकारी निर्माण करीत आहेत. त्यामुळे याविरोधात लढले पाहिजे. दुर्दैवाने ती लढाई दिसत नाही', अशी खंत वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केली. चुकीच्या गोष्टीविरोधात बोलल्यास लोक पाठीशी राहत नाहीत, हे बिहार विधानसभा निवडणुकीत दिसले आहे, असेही ते म्हणाले.

वंचित बहुजन आघाडीची पिंपरीत सभा झाली. त्यावेळी ते बोलत होते. आंबेडकर म्हणाले, 'देशातील राजकीय परिस्थिती बिघडत चालली आहे. लष्कराच्या प्रमुखाकडून चीन शुत्रू असल्याचे सांगितले जाते. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे चीन मित्र असल्याचे सांगत आहेत. यामध्ये जनतेने कोणावर विश्वास ठेवायचा, असा प्रश्न आहे. गेल्या १५ वर्षांपासून देशातील राजकारण धर्माच्या नावाने चालले आहे. त्यातून भारतबरोबर एकही मित्र राहिला नाही. अमेरिका आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात भांडण आहे. पाकिस्तानसोबतच्या चार दिवसांच्या युद्धात भारताची पाच विमाने पाडली. ही विमाने पाकिस्तानने नव्हे चीनने पाडली. पाकिस्तानला रशिया, चीन, इंग्लंड, अमेरिका, युरोप हे देश मदत करीत आहेत. धर्म आणि राष्ट्र वेगळे आहे. याची गल्लत मध्यवर्गीयांकडून केली जात आहे. भाजपला मतदान करणार नाही असा निर्धार मध्यवर्गीयांनी करावा', असे आवाहन त्यांनी केले.

'पिंपरी-चिंचवडमध्ये दोन प्रकारचे अतिक्रमण आहे. झोपडपट्यांचे अतिक्रमण आणि इमारतीमध्ये अनियमितपणे कामकाज झालेले अतिक्रमण आहे. हे लोक भीतीच्या सावटाखाली राहतात. कधी न्यायालयाचा निर्णय येईल आणि राहत्या घरावर गंडातर येईल, अशी भीती त्यांना सतावत आहे. पूर्णपणे अनियमित असलेल्या बांधकामाला संरक्षण देता कामा नाही. पण, जे कायद्यात बसू शकते आणि शहर विकासाला अडथळा निर्माण करीत नाहीत अशी अतिक्रमणे महापालिका कायदेशीर करू शकते. आगामी महापालिका निवडणुकीत कोण कोणाबरोबर जाईल याचा अद्यापही थांगपत्ता लागत नाही.



# बिबट्याच्या हल्ल्यात ८ वर्षीय बालक ठार

**जुन्नर :** जुन्नर तालुक्यात बिबट्याच्या हल्ल्यांची मालिका थांबायला तयार नाही.पारगाव मंगरूळ येथे सोमवारी (दि.१५ ) दुपारी कांदा काढणीचे काम सुरू असताना शेताच्या बांधावर बसलेल्या एका आठ वर्षीय मुलावर दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक हल्ला केला आणि त्याला ऊसाच्या शेतात ओढून नेले.

या हृदयद्रावक घटनेत गंभीर जखमी झालेल्या बालकाचा दुर्दैवी मृत्यू झाला असून पिंपरखेडच्या रोहन बोंबेच्या घटनास्थळा पासून पाचशे मीटरच्या अंतरावर ही घटना घडल्याने परिसरात भितीचे वातावरण पुन्हा गडध झाले आहे.

पारगाव येथे श्रीराम भिकाजी भोर यांच्या शेतात कांदा काढणीसाठी आलेल्या मजुरांचा मुलगा रोहित बाबू कापरे ( रा.धामणसई , ता.रोहा जि.रायगड ) हा शेताच्या बांधावर बसला होता.याचवेळी परिसरातील ऊसाच्या शेतात दबा धरून बसलेल्या बिबट्याने संधी साधून रोहितवर हल्ला केला आणि त्याला ओढत ऊसाच्या दाट शेतात नेले.यावेळी महिला मजुरांनी ऊसाच्या शेतात



शिरून बिबट्याच्या तावडीतून सोडवून पारगाव येथील खासगी दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आले परंतु या हल्ल्यात रोहित बाबु कापरे हा गंभीर जखमी झाल्याने उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला.

या घटनेमुळे संपूर्ण जुन्नर परिसरात पुन्हा एकदा खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ही घटना विशेषत: चिंताजनक आहे कारण, पिंपरखेड येथे काही दिवसांपूर्वी रोहन बोंबे या बालकाचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला होता. पारगाव मंगरूळ येथील आजची घटना पिंपरखेडच्या या पूर्वीच्या घटनास्थळापासून केवळ दीड किलोमीटर अंतरावर घडली आहे.

# पुण्यात पोलिस अधिकाऱ्याने थांबवले इंदुरीकर महाराजांचे कीर्तन

**पुणे :** मुलीच्या साखरपुडा कार्यक्रमात केलेल्या खर्चावरून टीकेचे धनी बनलेले प्रसिद्ध कीर्तनकार इंदुरीकर महाराज पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. आणि त्याला कारणीभूत ठरले आहे ते त्यांचे पुण्यातील कीर्तन.. पुण्यातील हडपसर परिसरात महाराजांच्या कीर्तनाचा कार्यक्रम होता. मात्र आयोजकांनी यासाठी रस्ताच अडवल्याने वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. त्यामुळे हडपसर परिसरात भली मोठी वाहतूक कोंडी झाली. त्यामुळे संतप्त झालेल्या सहायक पोलिस निरीक्षक प्रविण जाधव यांनी अखेर त्यांना कार्यक्रम थांबवण्यास सांगितले. याचा एक व्हीडीओ सध्या समोर आला आहे.

सध्या पुण्यात महानगरपालिका निवडणुकीचे वारे वाहत आहेत. अनेक इच्छुक आपल्या प्रभागात नागरिकांसाठी वेगवेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन करत आहेत. पुण्यातील काळेपडळ परिसरातही अशाच एका इच्छुक कार्यकर्त्याने इंदुरीकर महाराजांच्या कीर्तनाचा आयोजन केले होते आणि यासाठी चक्क वाहतुकीचा



रस्ताच अडवण्यात आला होता. परिणामी रस्त्यावर भली मोठी वाहतूक कोंडी झाली. काही ठिकाणी तर वाहनांच्या रांगाच लागल्या. संतप्त झालेल्या पोलिस अधिका-यांनी कार्यक्रमाच्या ठिकाणी येत थेट महाराजांना उद्देशूनच महाराज कार्यक्रम बंद करा असे सांगितले. पोलिस अधिकारी जाधव यांनी सांगितल्यानंतर महाराजांनीही काही वेळ कार्यक्रम बंद ठेवला. समोर आलेल्या व्हीडीओतील एक पोलिस अधिकारी अतिशय तावातवाने रस्ता बंद करण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला असे विचारताना दिसतोय. हे चालणार नाही रस्ता रिकामा करा असे म्हणत या पोलिस अधिका-यांनी चक्क महाराजांना उद्देशूनच महाराज कार्यक्रम बंद करा असा सज्जड दमच भरला. पोलिसांचा हा रुद्रावतार पाहून इंदुरीकर महाराजांनीही काही काळासाठी कार्यक्रम थांबवला. आणि त्यानंतर या पोलिस अधिका-याने हातात माईक घेत कार्यक्रम जर व्यवस्थित सुरू राहावा असे वाटत असेल तर रस्त्याची एक लाईन रिकामी करा असे म्हटले. हडपसरपर्यंत रस्ता जाम झाला आहे. लोकांना जाण्या येण्यासाठी रस्ता रिकामा करा असे म्हणत या पोलिस कर्मचा-यांनी विनंती केली. महाराजांचा कार्यक्रम चांगला आहे, मी सुद्धा बघितलाय, मी आणि महाराजांनी एकत्र जेवणही केले. त्यामुळे रस्ता मोकळा करावा असे म्हणत या पोलिस अधिका-यांनी विनंती केली आणि त्यानंतर नागरिकांनीही पोलिसांच्या विनंतीला मान देत रस्ता रिकामा केला आणि काही वेळाने हा कार्यक्रम पुन्हा सुरू झाला.

# कोंढव्यात शिक्षिकेचे मंगळसूत्र हिसकावले

**पुणे :** दुचाकीस्वार शिक्षिकेचे मंगळसूत्र चोरट्यांनी हिसकावून नेल्याची घटना कोंढवा परिसरात घडली. याप्रकरणी चोरट्यांविरुद्ध कोंढवा पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याबाबत शिक्षिकेने फिर्याद दिली आहे. तक्रारदार शिक्षिका कोंढवा बुद्रुक भागात राहायला आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रादार शिक्षिका गुरुवारी (११ डिसेंबर) रात्री आठच्या सुमारास शिकवणी वर्गातून घरी निघाल्या होत्या.

काकडे वस्ती परिसरात दुचाकीस्वार शिक्षिकेच्या गळ्यातील ९० हजारांचे मंगळसूत्र चोरट्यांनी हिसकावून नेले. शिक्षिकेने आरडाओरडा केला. चोरटे भरधाव वेगात दुचाकीवरुन पसार झाले. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरण ताब्यात घेतले असून, पसार झालेल्या चोरट्यंचा माग काढण्यात येत आहे. गेल्या काही महिन्यांपासून शहरात पादचारी महिलांकडील दागिने, तसेच नागरिकांना धमकावून मोबाइल संच हिसकावण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे.

### तोतया पोलिसांकडून ज्येष्ठ नागरिकाची फसवणूक

पोलीस असल्याची बतावणी करुन ज्येष्ठ नागरिकाकडील सोनसाखळी चोरट्यांनी लांबविल्याची घटना कात्रज-कोंढवा रस्त्यावर घडली. याबाबत एका ज्येष्ठ नागरिकाने भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याप्रकरणी तीन चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार ६३ वर्षीय ज्येष्ठ नागरिक हे कात्रज-कोंढवा रस्त्यावरील माऊलीनगर भागात राहायला आहेत. १० डिसेंबर रोजी सकाळी पावणेअकराच्या सुमारास ते कात्रज-कोंढवा रस्त्याने निघाले होते. त्यावेळी चोरट्यांनी त्यांना अडवले.

## श्रीमंत सरसेनापती कहदेराव दाभाडे पूल धोकादायक

**पिंपरी :** आळंदीतील इंद्रायणी नदीवरील चऱ्होली बुद्रुक ते चऱ्होली खुर्द रस्ता जोडणारा बारा मीटर रुंदीचा श्रीमंत सरसेनापती कहदेराव दाभाडे पूल कमकुवत झाला आहे. वाहतुकीस धोकादायक झाल्याने या पुलाचे दुरुस्तीचे काम तातडीने सुरु करण्यात येणार आहे. त्यामुळे हा पूल सर्व प्रकारच्या वाहतुकीस बंद करण्यात आला आहे.

दिघी आळंदी वाहतूक विभागाचे हद्दीतील श्री क्षेत्र देहू, आळंदी तीर्थक्षेत्र आराखडा अंतर्गत बांधण्यात आलेला हा पूल आहे. बारा मीटर रुंदीचा श्रीमंत सरसेनापती कहदेराव दाभाडे पूल कमकुवत झाला आहे. त्यामुळे वाहतुकीस धोका निर्माण झाला आहे. या पुलाचे सुधारणा करण्याचे काम तातडीने सुरु करण्यात येणार आहे. त्यामुळे आळंदी येथील इंद्रायणी नदीवरील बारा मीटर रुंदीचा हा पूल सर्व प्रकारच्या वाहतुकीस बंद करण्यात येत आला आहे. या पुलावरुन ये-जा करणारे वाहनांकरीता पर्यायी मार्ग उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

देहू फाटक्याकडून येणारी वाहतूक अलंकापुरम चौक/तापकीर चौक पांजरपोळ चौक/ गोडावून चौक मोशी मार्गे इच्छित स्थळी जाईल. मॅगझिन चौकाकडून येणारी वाहतूक अलंकापुरम चौकातून डावीकडे वळुन पुणे-नाशिक हायवे मार्गे इच्छित स्थळी जाईल. देहू फाटा चौकातील वाहतूक डावीकडे वळून भारतमाता चौक पुणे-नाशिक हायवे मार्गे इच्छित स्थळी जाईल. तुळापूरकडून येणारी वाहतूक मरकळ गावातून उजवीकडे वळून कोयाळीगांव चाकण-शिक्रापूर हायवे मार्गे इच्छित स्थळी जाईल. याबाबतची अधिसूचना वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त विवेक पाटील यांनी काढली आहे.

# म्हाडा सोडतीला पुन्हा ब्रेक

■ **तांत्रिक बिघाडाचा फटका अर्जदारांना, पुणे मंडळाच्या ४१८६ घरांची सोडत पुन्हा पुढे**

**मुंबई :** म्हाडाच्या पुणे मंडळाच्या ४१८६ घरांसाठीची सोडत पुन्हा लांबणीवर पडली आहे. या घरांसाठी १६ किंवा १७ डिसेंबरला सोडत काढली जाईल असे पुणे मंडळाकडून जाहिर करण्यात आले होते. मात्र आता तांत्रिक अडचणींमुळे ही सोडत रद्द करण्यात आल्याने दोन लाख १५ हजार अर्जदारांची सोडतीची प्रतीक्षा वाढली आहे. सोडतीची नवीन तारीख अद्याप मंडळाकडून जाहिर करण्यात आलेली नाही. एक-दोन दिवसात नवीन तारीख जाहिर होण्याची शक्यता आहे. सोमवारी सायंकाळी ६ वाजता पात्र अर्जांची प्रारूप यादी म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे.

सप्टेंबरमध्ये पुणे मंडळाने पुण्यातील ४१८६ घरांसाठी ११ सप्टेंबरपासून नोंदणी, अर्जविक्री-स्वीकृती प्रक्रिया सुरू केली. पुणे मंडळाला २० टक्के सर्वसमावेशक योजनेअंतर्गत उपलब्ध झालेल्या ३२२२ घरांसह १५ टक्के एकात्मिक योजनेतील ८६४ घरांचा या सोडतीत समावेश आहे. ४१८६ घरांसाठी सोडतपूर्व प्रक्रिया सुरू झाली, मात्र संगणकीय प्रणालीतील तांत्रिक अडचणींमुळे या प्रक्रियेस दोनदा मुदतवाढ देण्याची नामुष्की मंडळावर आली. या मुदतवाढीमुळे २१ नोव्हेंबरची सोडत ११ डिसेंबरवर गेली, नंतर ११ डिसेंबरची सोडतही पुढे ढकलावी लागली. मात्र सोडतीची नवीन तारीख जाहीर न करताच पुणे मंडळाने सोडतपूर्व प्रक्रिया पूर्ण केली. त्यानुसार ४१८६ घरांसाठी अनामत रक्कमेसह दोन लाख १५ हजार ८४७ अर्ज सादर झाले आहेत. या अर्जांच्या माध्यमातून अनामत रक्कमेच्या पोटी मंडळाकडे ४४६ कोटी ९७ लाख रुपये जमा झाले आहेत.

# शिक्षणासाठी अमेरिकेत तीन तासात पैसे पाठविण्याच्या बहाण्याने १६ लाखांची फसवणूक

**पिंपरी :** मुलाला शिक्षणासाठी अमेरिकेत तातडीने पैसे पाठवायचे होते. पण, पैसे कसे पाठवायचे असा प्रश्न निर्माण झाला. त्यामुळे एका व्यक्तीस संपर्क साधला असता त्याने तीन तासात आपल्या ओळखीचे लोक मुलाला पैसे पाठवतील असा विश्वास दिला. विश्वास संपादन करून आरटीजीएसद्वारे १५ लाख ७५ हजार रुपये स्वत:च्या बँक खात्यावर वळती करून घेत फसवणूक केल्याचा प्रकार चिखली प्राधिकरण येथे उघडकीस आला.

याप्रकरणी ५५ वर्षीय व्यक्तीने चिखली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अंधेरी, मुंबई येथील एका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांचा मुलगा अमेरिका येथे शिक्षण घेत आहे. त्याला शैक्षणिक फी भरण्यासाठी तात्काळ १७ हजार ५०० डॉलर (भारतीय चलनात १५ लाख ७५ हजार रुपये) आवश्यक होते. याबाबत फिर्यादीने यांनी आरोपीला विचारणा केली. आरोपीने माझे ओळखीचे लोक तीन तासात तुमच्या मुलापर्यंत पैसे पाठवतील, काळजी करू नका असे सांगून फिर्यादीचा विश्वास संपादन केला. त्याच्यावर विश्वास ठेऊन फिर्यादीने आरोपीला पैसे पाठवले. मात्र ते पैसे फिर्यादीच्या मुलाला न देता आरोपीने त्याचा अपहार करून फसवणूक केली. चिखली पोलीस तपास करत आहेत.

## माऊलींच्या दर्शनासाठी आलेल्या दोघांचे खंडणीसाठी अपहरण

**पिंपरी :** तीर्थक्षेत्र आळंदी येथे संत ज्ञानेश्वर महाराजांच्या दर्शनासाठी आलेल्या दोन ज्येष्ठ नागरिकांचे अपहरण करून त्यांच्या नातेवाईकांकडे दोन लाख रुपयांची खंडणी मागितली आणि धमकावले. ही घटना मंगळवारी (९ डिसेंबर) दुपारी चार वाजता चाकण चौक, आळंदी येथे घडली. याबाबत अपहरण झालेल्या व्यक्तीच्या मुलाने आळंदी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी सचिन सुरेश मोरे (वय ३०, चऱ्होली खुर्द, खेड) आणि एक महिला (४०, चऱ्होली खुर्द, खेड) यांना अटक करण्यात आली आहे.

# अंतिम यादी प्रसिद्ध, सर्वच प्रभागातील मतदारसंख्येत बदल

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी सोमवारी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली. यामध्ये सर्व ३२ प्रभागामधील मतदार संख्येत बदल झाला आहे. १५ प्रभागांमध्ये मतदारांची संख्या वाढली असून १७ प्रभागातील मतदारसंख्येत घट झाली. त्यानुसार प्रभाग क्रमांक १६ रावेत-किवळेमध्ये सर्वाधिक ७५ हजार १०५, तर प्रभाग क्रमांक २३ थेरगाव गावठाण-पडवळनगरमध्ये सर्वात कमी ३३ हजार ३३ मतदार आहेत.

महापालिकेच्या निवडणूक विभागाने २० नोव्हेंबर रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली होती. त्यावर हरकती घेण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने तीन डिसेंबरपर्यंत मुदत दिली होती. या मुदतीत दहा हजार २८८ हरकती प्रारुप यादीवर आल्या होत्या. त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी अधिकाऱ्यांच्या बैठका घेत मतदार याद्यांमध्ये दुरूस्ती करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार अधिकाऱ्यांनी मतदार याद्यांमध्ये बदल केले आहेत. सर्वच प्रभागातील मतदार संख्येमध्ये बदल झाले आहेत.

प्रारूप मतदार यादीमध्ये सर्वाधिक मतदार संख्येचा प्रभाग क्रमांक एक चिखली गावठाण होता. आता अंतिम यादीनुसार सर्वाधिक मतदार संख्येचा प्रभाग क्रमांक १६ रावेत-किवळे असणार आहे. या प्रभागात ७५ हजार १०५ मतदार झाले आहेत, तर प्रभाग क्रमांक २३ पडवळनगर-थेरगाव हा सर्वाधिक कमी संख्येचाच राहिला आहे. या प्रभागातील एक हजार ७३३ मतदार घटले आहेत. त्यामुळे या प्रभागातील इच्छुकांना दिलासा मिळाला आहे.

### १५ प्रभागात मतदार वाढले, १७ मध्ये घटले

अंतिम मतदार यादीमध्ये १५ प्रभागांमध्ये मतदार वाढले असून १७ प्रभागात घटले आहेत. प्रभाग क्रमांक दोन, चार, पाच, आठ, ११, १२, १४, १६, १९, २०, २४, २५, २८, ३१ आणि ३२ या प्रभागात मतदार वाढले आहेत. प्रभाग क्रमांक एक, तीन, सहा, सात, नऊ, दहा, १३, १५, १७, १८, २१, २२, २३, २६, २७, २९ आणि ३० या प्रभागातील मतदार घटले आहेत.

### १७ लाख १३ हजार ८९१ मतदार ठरविणार १२८ नगरसेवक

महापालिका निवडणुकीसाठी विधानसभेच्या मतदार याद्या वापरण्यात येणार आहेत. एक जुलै २०२५ पर्यंतची मतदार संख्या गृहित धरण्यात आली. चिंचवड विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक सहा लाख ७६ हजार ६३८, भोसरीत सहा लाख २४ हजार १५२, पिंपरीत तीन लाख ९९ हजार ८११ आणि भोर विधानसभा मतदारसंघातील ताथवडेगावात १३ हजार २९० मतदार आहेत. महापालिका निवडणुकीत नऊ लाख पाच हजार ७२८ पुरूष, आठ लाख सात हजार ९६६ महिला आणि इतर १९७ असे १७ लाख १३ हजार ८९१ मतदार मतदानाचा हक्क बजाविणार आहेत.

### मतदान केंद्राची यादी शनिवारी

मतदान केंद्राच्या ठिकाणांची यादी २० आणि मतदान केंद्र निहाय मतदान यादी २७ डिसेंबर रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे. शहरात ९२ हजार ६६४ दुबार मतदार आहेत. या मतदारांकडून कोणत्या केंद्रावर मतदान करणार याबाबतचे हमीपत्र घेण्याचे काम सुरू आहे. २२ डिसेंबर रोजी दुबार मतदारांबाबतची स्पष्टता होईल, असे निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितले.